# तरूणांच्या आक्रोशाने संसद हादरली

• वर्ष : ०३ • अंक : २११ • पुणे • मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313



## मोदी सरकारच्या कार्यकाळातील पहिले हिंसक आंदोलन

# आंदोलनाचे नेतृत्व विद्यार्थ्यांकडे; दिल्लीच्या रस्त्यांवर उसळली गर्दी

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

शेतकरी संघटनांपासून विरोधी पक्षांपर्यंत अनेकांनी दिल्लीत आंदोलन करून केंद्र सरकारला घेरण्याचे प्रयत्न केले. मात्र, नरेंद्र मोदी सरकारच्या कार्यकाळात पहिल्यांदाच आंदोलक थेट संसदेवर धडकले. संसद भवनाकडे जाणारे महत्त्वाचे रस्ते तरुण-तरुणींनी व्यापून टाकल्याने पोलीस व निमलष्करी दलाला आंदोलकांना आवरता येत नसल्याने सुरक्षा व्यवस्था हतबल झाल्याचे पाहायला मिळाले. आंदोलकांना आवरण्यासाठी पोलिसांना वारंवार अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागत होत्या. तरीही आंदोलक मागे हटायला तयार नव्हते.

मोदी सरकारच्या १२ वर्षांत पहिल्यांदाच संसद भवन परिसरातील आंदोलनावेळी सुरक्षा व्यवस्था निर्नायकी दिसत होती. यापूर्वी शेतकऱ्यांचे आंदोलन झाले होते, मात्र ते दिल्लीच्या वेशीबाहेर होते. त्यापूर्वी २०१९मध्ये जंतरमंतरवर शेतकरी संघटनांनी दोन दिवस आंदोलन केले होते. मात्र कोणतेही आंदोलन इतके हिंसक झालेले नव्हते. संसदेकडे पोहोचणाऱ्या संसद मार्ग, रायसीना, अशोका, रफी, राजेंद्र प्रसाद, रकाबगंज, पंत आदी सहा-सात मार्ग काही किमीपर्यंत आंदोलकांनी भरून गेले होते. संसदेच्या समोरील चौकाला लागूनच सरकारी मंत्रालये असलेले शास्त्री भवन, कृषि भवन आहे. हा सगळा परिसर तरुण आंदोलकांनी दणाणून टाकला होता.

मुंबई : सोनम वांगचुक यांच्यावर टीका करणाऱ्या भाजप शासनाच्या अनेक शैक्षणिक प्रयोगांच्या प्रसारासाठी वांगचुक यांच्या नावाचा वापर शासनाकडून करण्यात आला आहे. भाजप सर्मथकांकडून वांगचुक यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत प्रश्न उभे करण्यात येत आहेत, तर भाजपच्या नेत्यांकडूनही त्यांच्यावर टीका करण्यात येत आहे. मात्र, याच भाजप शासनाने केलेले शैक्षणिक प्रयोग, प्रकल्प, धोरण यांच्या प्रचारासाठी वांगचुक यांची उदाहरणे देण्यात येत होती. भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे हे महाराष्ट्रात शिक्षण मंत्री असताना ते अधिकाऱ्यांसमवेत वांगचुक यांचा लडाख येथील प्रकल्प, शाळा पाहून आले होते.

संसदेवरील मोर्चामध्ये सहभागी होण्यासाठी सोमवारी सकाळी सर्व थरांतील आणि वयोगटातीलही नागरिक जंतर-मंतरकडे जमा होत होते. हातात विविध संदेश लिहिलेले फलक आणि तिरंगा घेतलेले निदर्शक 'भारत माता की जय', 'जय भीम', 'वंदे मातरम' आणि 'धर्मेंद्र प्रधान इस्तिफा दो', अशा घोषणा देत होते. निदर्शकांना थांबवल्यावर ते तिथेच ठिय्या देऊन बसत होते. काही निदर्शक गणवेष परिधान करून आले होते. काहींच्या अंगावर झुरळाचे वेश होते. संसद परिसरापासून दोन किमी अंतरावर नीती आयोग भवनाजवळील 'नॅशनल एज्युकेशन इंस्टिट्यूट फॉर ट्रायबल अफेअर्स'च्या इमारतीजवळ 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

सोनम वांगचुक यांची पत्नी गीतांजली अंगमो यांच्याशी गैरवर्तन केले नाही, असा खुलासा दिल्ली पोलिसांनी सोमवारी केला. यासंबंधी करण्यात आलेले आरोप पूर्णपणे खोटे आणि दिशाभूल करणारे आहेत, असे पोलिसांनी सांगितले. त्याचबरोबर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना ताब्यात घेतले नसल्याचेही दिल्ली पोलिसांनी नमूद केले. दिपके आणि अंगमो यांना ताब्यात घेतलेले नाही, असा खुलासा दिल्ली पोलिसांनी केला असला तरी, त्या दोघांना जवळच्या केरळ हाऊस येथे नेण्यात आले, त्यानंतर त्यांनी तिथे धरणे आंदोलन सुरू ठेवले असे सांगण्यात आले. दरम्यान, पोलिसांनी जंतर-मंतर येथील आंदोलनाचे व्यासपीठ मोडून टाकले. तसेच तो संपूर्ण परिसर ताब्यात घेतला.

सीजेपीच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबईत आयोजित आंदोलन पोलिसांनी सोमवारी दडपले. डाव्या पक्षांमार्फत आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनापूर्वीच पोलिसांनी आयोजकांच्या घरी धाव घेऊन त्यांना नजरकैदेत ठेवले. तसेच, त्यांना आंदोलनस्थळी जाण्यापासून रोखण्यात आले. दादर परिसरात आंदोलनासाठी दाखल झालेल्या तरुणांनाही ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

मुंबईतील चैत्यभूमीवर शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, काँग्रेस, समाजवादी पक्ष यांनी वांगचुक यांच्या सर्मथनार्थ आंदोलन आयोजित केले होते. मात्र आंदोलनस्थळी पोहोचण्यापूर्वीच पोलिसांनी आयोजकांना घरात गाठले आणि त्यांना घराबाहेर पडण्यास मज्जाव केला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सचिव मिलिंद रानडे यांना टिळक नगर पोलिसांनी घरी स्थानबद्ध केले. तसेच, त्यांच्या घराबाहेर पोलीस तैनात केल्याने त्यांना आंदोलनस्थळी पोहोचणे शक्य झाले नाही. शेतकरी कामगार पक्षाचे अ‍ॅड. राजेंद्र कोरडे हे घराबाहेरच असल्याने ते कसेबसे आंदोलनस्थळी पोहोचले. 'सीजेपी'च्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सोमवारी विदर्भात सर्वच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आंदोलन झाले.

नागपूर, गोंदिया, भंडारा, बुलढाणा, गडचिरोली, चंद्रपूर येथे विविध सामाजिक, राजकीय संघटनाच्या माध्यमातून सुमारे शंभर ठिकाणी झालेल्या आंदोलनात तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाली. विशेष म्हणजे, आंदोलनातील तरुणांचा सहभाग हा उत्स्फुर्त स्वरुपाचा होता. ते 'शिक्षण मंत्री होश मे आओ', 'तानाशाही नाही चलेगी' अशा घोषणा देत सरकार विरोधात संताप व्यक्त करीत होते.

## वांगचुक यांच्या प्रकृतीत सुधारणा

**सफदरजंग रुग्णालयात दाखल असलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची महत्त्वाची लक्षणे स्थिर असल्याची माहिती रुग्णालयातर्फे देण्यात आली. वांगचुक यांच्या रक्तातील साखरेची पातळी अजूनही कमी आहे, मात्र त्यांना तोंडावाटे 'ओआरएस' तसेच पोटॅशियमची पूरक औषधे दिली जात असल्याने अन्य घटकांमध्ये सुधारणा दिसत आहे. संसदेच्या मुख्य द्वारापर्यंत आंदोलक येऊन धडकल्याने संसद भवनाच्या आतील तैनात सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली. संसदेची सर्व प्रवेशद्वारे तातडीने बंद करण्यात आली. नॉर्थ ब्लॉक आणि साऊथ ब्लॉक असलेल्या विजय चौकातील संसदेच्या प्रवेशद्वारातून पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह सर्व मंत्री संसदेमध्ये येतात, हे प्रवेशद्वार अतिमहत्त्वाचे मानले जाते. या प्रवेशद्वारावर सुरक्षाव्यवस्था वाढण्यात आली.**






## 'मोदी इतिहासातील सर्वात युवा-विरोधी पंतप्रधान!'

**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाच्या इतिहासातील सर्वाधिक युवा-विरोधी पंतप्रधान आहेत, अशी घणाघाती टीका लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी केली. केंद्र सरकार केवळ युवकांचे प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरले नाही तर ते त्यांच्यावरच हल्ला करत आहेत, असा आरोप राहुल यांनी केला. दिल्ली पोलिसांनी निदर्शकांना लाठीमार केल्यानंतर राहुल यांनी पंतप्रधान मोदी आणि केंद्र सरकारला लक्ष्य केले. नरेंद्र मोदी तरुणांच्या इतके विरोधात आहेत, की त्यांनी अपयशी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामाही घेतला नाही, असे राहुल म्हणाले. त्यांनी 'एक्स'वर एक ध्वनिचित्रफीत प्रसिद्ध करून निदर्शकांच्या मागण्या वैध असल्यामुळे आपला त्यांना पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. तसेच तरुणांवरील कारवाईवर टीका केली.**



**हजारो विद्यार्थी जंतर-मंतरवर पोहोचले आहेत आणि त्यांच्यावर लाठीमार करण्यात आला. सरकार त्यांना गप्प करण्याचा आणि मुद्दा गुंडाळण्याचा प्रयत्न करत आहे.**

**– मल्लिकार्जुन खरगे, विरोधी पक्षनेते, राज्यसभा**



**ही आपली मुले आहेत. ते आपल्या देशाचे भविष्य आहेत. हे संसद त्यांचे आहे. कोणा एकाची वैयक्तिक जहागिरी नाही. शैक्षिणक धोरणात समस्या आहेत, त्यामुळे त्यावर चर्चा व्हायला हवी, असे आम्ही सुरुवातीपासून म्हणत होतो. तुम्ही चर्चा करायला तयार नाही आणि मुलांवर अश्रुधूर सोडता, त्यांना मारता. कशासाठी?**

**– प्रियंका गांधी, खासदार, काँग्रेस**

## युवक चर्चेत

**आंदोलनकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात अनेक आंदोलक जखमी झाल्याचा दावा करण्यात आला. या गोंधळात सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून मारहाण होत असतानाही 'मला मारा, सर...,' असे वारंवार म्हणणाऱ्या एका युवकाची चित्रफीत समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाली. हा युवक नागपूरचा असून भारत बानाईत असे त्याचे नाव आहे. शीघ्र कृती दलाच्या १५ ते २० जवानांनी त्याच्यावर लाठीमार केला. "माझ्या डोक्यासह संपूर्ण शरीरावर मारहाण झाली. विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर सरकारने केलेली ही कारवाई निषेधार्ह आहे," असे या युवकाने सांगितले. अखेर एका महिला पोलीस अधिकाऱ्याने हस्तक्षेप करून त्याला तेथून बाजूला नेण्याचा प्रयत्न केला.**



# रुग्णांच्या उत्तम आरोग्यासाठी डॉक्टरांची पावले

**सकारात्मक परिणाम दिसून आले - डॉ. आरती शहाडे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एक निरोगी भारत घडवण्यात डॉक्टरांनी नेहमीच अतुलनीय भूमिका बजावली आहे. सार्वजनिक आरोग्य, जनहित आणि जनजागृतीसाठी डॉक्टरांनी केलेल्या समर्पित प्रयत्नांची व महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेत, वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर आणि आरोग्य तज्ज्ञांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

आजच्या काळात आरोग्यसेवा ही केवळ औषधोपचारांपुरती मर्यादित राहिलेली नाही; संतुलित जीवनशैली, नियमित व्यायाम आणि योग हे उत्तम आरोग्याचे महत्त्वाचे आधारस्तंभ बनले आहेत. योग केवळ शारीरिक आरोग्यच सुधारत नाही, तर मानसिक संतुलन, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोनही वृद्धिंगत करतो. म्हणूनच, वैद्यकीय तज्ज्ञ लोकांना योग आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्यास वारंवार प्रोत्साहित करतात. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशभरात आरोग्य आणि योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून विविध आरोग्य समस्या टाळता येतात आणि वाढत्या वयातही निरोगी, सक्रिय व उत्साही जीवन जगता येते, यावर तज्ज्ञांनी भर दिला. या उद्देशाला पुढे नेण्यासाठी एका विशेष योग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी एका अनुभवी योग तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात आले होते; त्यांनी उपस्थित रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना विविध योगासने, प्राणायाम आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व यांबाबत सविस्तर माहिती दिली.

> याप्रसंगी बोलताना 'सहदे हॉस्पिटल'च्या फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट डॉ. आरती शहाडे यांनी सांगितले की, वैद्यकीय सेवा हा केवळ एक व्यवसाय नसून समाजाप्रती असलेली एक महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. त्यांनी नमूद केले की, डॉक्टरांचे योगदान केवळ आजारांवर उपचार करण्यापुरते मर्यादित नाही; तर ते लोकांना उत्तम आरोग्य, जनजागृती आणि निरोगी जीवनशैलीसाठी प्रयत्न करण्यास सतत प्रेरित करत असतात.

# आकाशचा सोहम पाटील पुणे शहरात अव्वल

- देशात ५३ वा क्रमांक ७२० पैकी ६९५ गुणांची उल्लेखनीय कामगिरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडच्या पुणे शाखेतील विद्यार्थी सोहम पाटील याने राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा अर्थात 'नीट यूजी २०२६'मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सोहमने ७२० पैकी तब्बल




६९५ गुण मिळवत अखिल भारतीय स्तरावर ५३ वा क्रमांक पटकावला असून, पुणे शहरात अव्वल स्थान मिळवल्याचा दावा संस्थेने केला आहे. आकाशच्या पुणे येथील पुलगेट शाखेच्या वर्गातील नियमित अभ्यासक्रमाचा विद्यार्थी असलेल्या सोहमच्या या यशामुळे संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. सातत्यपूर्ण मेहनत, दृढनिश्चय, शिस्तबद्ध अभ्यास आणि नियोजनबद्ध तयारीच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले. त्याच्या या यशामागे संस्थेतील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सुसंघटित शिक्षण पद्धतीचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे संस्थेने म्हटले आहे.

पुण्यातील पुलगेट शाखेतीलच नियमित वर्गातील विद्यार्थी निखिल बेवल यानेही नीट यूजी २०२६ मध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. निखिलने ७२० पैकी ६७५ गुण मिळवत अखिल भारतीय स्तरावर ३८९ वा क्रमांक प्राप्त केला आहे. सोहम आणि निखिल या दोन्ही विद्यार्थ्यांच्या यशामुळे पुणे शाखेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण कामगिरीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाल्याचे संस्थेने नमूद केले. आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने नीट यूजी २०२६ मध्ये आपल्या विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या परीक्षेत आकाशच्या चार विद्यार्थ्यांनी देशातील पहिल्या दहा क्रमांकांमध्ये स्थान मिळवले आहे. त्याचबरोबर १८ विद्यार्थ्यांनी पहिल्या ५० मध्ये, तर ४१ विद्यार्थ्यांनी देशातील पहिल्या १०० विद्यार्थ्यांमध्ये स्थान पटकावले आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील हे निकाल संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षण पद्धतीचा परिणाम असल्याचे संस्थेने म्हटले आहे. अनुभवी शिक्षक, सर्वसमावेशक अभ्यास साहित्य, नियमित सराव परीक्षा, विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विश्लेषण, शंका निरसन सत्रे आणि वैयक्तिक मार्गदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी तयार केले जात असल्याचेही संस्थेकडून सांगण्यात आले.



# राज्यातील ७.५ लाख शिक्षकांना एआय प्रशिक्षण

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील शिक्षकांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) साक्षरता वाढवण्यासाठी 'एआय साथी फॉर एज्युकेटर्स' या अभ्यासक्रमाची घोषणा करण्यात आली. 14 जुलै रोजी मंत्रालयात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते या अभ्यासक्रमाचे उद्घाटन झाले. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या सुमारे 7.5 लाख शिक्षक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसाठी हा अभ्यासक्रम अनिवार्य असणार असून, राज्याच्या 20 तासांच्या ऑनलाइन व्यावसायिक विकास कार्यक्रमांतर्गत चार तासांचे प्रमाणित प्रशिक्षण दिले जाणार आहे. हा अभ्यासक्रम DIKSHA प्लॅटफॉर्मवर मराठी भाषेत उपलब्ध आहे. यावेळी शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी एआय शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापनातील प्रभावी सहकारी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. एससीईआरटीचे संचालक डॉ. हेमंत वासेकर यांनी एआयमुळे शिक्षकांचे कार्य अधिक परिणामकारक होईल, असे सांगितले.

# 'गुणवत्तेचा गौरव, उज्ज्वल भविष्याचा संकल्प'

## संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने ७०० हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ त्यांच्या यशाचा गौरव नसून समाजाच्या उज्ज्वल भविष्यातील गुंतवणूक आहे, असा संदेश देणारा संस्कृती प्रतिष्ठानचा २४ वा 'गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ' रविवारी कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात उत्साहात पार पडला. दहावी आणि बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या ७०० हून अधिक विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या वेळी झारखंडचे नागरी संरक्षण आयुक्त रमेश घोलप यांनी आपल्या संघर्षमय जीवनप्रवासातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. "यश हे केवळ गुणपत्रिकेत नसते, तर सातत्यपूर्ण प्रयत्न, जिद्द आणि व्यक्तिमत्त्व विकासात असते," असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, अभिनेते-दिग्दर्शक प्रवीण तरडे, अभिनेत्री स्नेहल तरडे, नगरसेवक नीलेश कोंढाळकर, दिनेश माथवड, वासंती जाधव, ज्योत्स्ना कुलकर्णी, अल्पना वरपे, महेश शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी गुणवत्तेसोबतच सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव जोपासावी, असे आवाहन उपस्थितांनी केले.

यावेळी संस्कृती प्रतिष्ठानने स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या १०० विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारण्याची महत्त्वाकांक्षी घोषणा केली. ज्ञानदीप अकॅडमीच्या माध्यमातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन, अभ्यास साहित्य आणि आवश्यक पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातून अधिकाधिक युवकांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश करून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले. समाजासाठी प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींचाही यावेळी गौरव करण्यात आला. धाडसाने इतरांचे प्राण वाचविणाऱ्या आशिष वाकचौरे तसेच अवघ्या सव्वादोन वर्षांच्या वयात हनुमान चालीसा मुखोद्गत असलेल्या चिमुकल्या ध्रुव पवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करताना शिक्षण, संस्कार आणि राष्ट्रसेवेची भावना जोपासणारी तरुण पिढी घडविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आषाढी एकादशी : पाणीपुरवठा सुरळीत सुरु ठेवण्याची मागणी

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहरामध्ये सध्या 22 जुलै पर्यंत पाणी कपात न करण्याचा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे. परंतु शनिवार दि 25 रोजी आषाढी एकादशी असल्यामुळे सिंहगड रस्त्यावरील प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या विठ्ठलवाडी येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. यादिवशी शहरात आणि सिंहगड रस्ता परिसरात पाणी कपात केल्यास नागरिकांची आणि भाविकांची गैरसोय होऊ शकते. तसेच सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तरी दरम्यान च्या काळात पाणीपुरवठा सुरु ठेवावा अशी विनंती काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते अविनाश खंडारे यांनी पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांच्याकडे केली आहे. या मागणीचे पत्र त्यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना देखील दिले आहे. या पत्रावर संभाजी उर्फ आबा जगताप, महेश शिंदे आणि अजय खुडे या काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. तरी महापालिका आयुक्त यांनी या पात्राची दखल घेऊन कार्यवाही करावी अशी मागणी अविनाश खंडारे यांनी केली आहे.

### किआची 'सिरोस ईव्ही' बाजारात; २५ हजार रुपयांपासून पूर्वनोंदणी



नाशिक (आरंभ पर्व) : भारतातील आघाडीची मास-प्रीमियम वाहन उत्पादक कंपनी किआ इंडियाने इलेक्ट्रिक वाहनांच्या क्षेत्रातील आपली उपस्थिती आणखी मजबूत करत दुसरी मास-मार्केट इलेक्ट्रिक एसयूव्ही 'सिरोस ईव्ही' सादर केली आहे. या नव्या इलेक्ट्रिक एसयूव्हीसाठी २५ हजार रुपयांपासून पूर्वनोंदणी सुरू करण्यात आली असून, ग्राहक किआ इंडियाच्या संकेतस्थळावर तसेच देशभरातील अधिकृत विक्री केंद्रांमधून वाहनाची नोंदणी करू शकणार आहेत. 'सिरोस ईव्ही'चे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिची ५२६ किलोमीटरची एआरएआय-प्रमाणित रेंज. कंपनीच्या म्हणण्यानुसार, ही रेंज या वाहन श्रेणीतील सर्वोत्तम आहे. इलेक्ट्रिक वाहन खरेदी करताना ग्राहकांच्या मनात असलेल्या रेंज, बॅटरीचे आयुष्य, पुनर्विक्री मूल्य आणि वाहनाच्या दीर्घकालीन वापराबाबतच्या चिंता लक्षात घेऊन कंपनीने या वाहनासोबत विशेष मालकी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामध्ये उच्च-दाब बॅटरीसाठी आजीवन हमी, निश्चित पुनर्खरेदी योजना आणि 'बॅटरी-ॲज-अ-सर्व्हिस' या सुविधांचा समावेश आहे. या सुविधांच्या माध्यमातून इलेक्ट्रिक वाहन खरेदी आणि वापराबाबत ग्राहकांमध्ये अधिक विश्वास निर्माण करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे.

### 'बॅक टू स्कूल' ऑफर्स; गॅलेक्सी उपकरणांवर विशेष सवलतींचा वर्षाव

गुरुग्राम (आरंभ पर्व) : विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक प्रभावी आणि स्मार्ट पद्धतीने शिक्षण घेता यावे, यासाठी सॅमसंग इंडियाने आपल्या संपूर्ण गॅलेक्सी उपकरण श्रेणीसाठी 'बॅक टू स्कूल' विशेष ऑफर्सची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना गॅलेक्सी बुक ६ प्रो, गॅलेक्सी टॅब एस ११ अल्ट्रा, स्मार्ट मॉनिटर एम ८, गॅलेक्सी एस २६ मालिका, गॅलेक्सी वॉच ८ आणि गॅलेक्सी बड्स ४ मालिकेसह विविध उपकरणांच्या खरेदीवर विशेष सवलती आणि आर्थिक लाभ मिळणार आहेत. सॅमसंगच्या 'स्टुडंट+' कार्यक्रमाच्या माध्यमातून पात्र विद्यार्थ्यांना निवडक गॅलेक्सी उपकरणांवर १० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त सवलत दिली जाणार आहे. त्याचबरोबर निवडक बँकांच्या कार्डांवर ५ हजार रुपयांपर्यंतचे लाभ, विनाव्याज मासिक हप्त्यांचे पर्याय आणि उपकरण अद्ययावत करण्यासाठी विशेष फायदे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# दीर्घकालीन निरामय आरोग्यासाठी आयुर्वेद महत्त्वपूर्ण

- शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांचे प्रतिपादन
- प्राचीन संहिता गुरुकुलातर्फे 'दिग्गजांच्या मुलाखती' कार्यक्रम




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आयुर्वेद हा भारताचा प्राचीन आणि समृद्ध ज्ञानवारसा असून, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत दीर्घकालीन निरामय आरोग्य राखण्यासाठी त्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. आधुनिक वैद्यकासोबत आयुर्वेद आणि निसर्गोपचार यांचा समन्वय साधल्यास अनेक जीवनशैलीजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. मात्र, आयुर्वेदाच्या शास्त्रीय तत्त्वांची आणि त्याच्या उपयुक्ततेची पुरेशी माहिती अजूनही समाजापर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे आयुर्वेदाबाबत जनजागृती होणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी केले.

वैद्य डॉ. हरीश पाटणकर यांच्या ज्ञानसंकुल विद्यार्थी संघाच्या प्राचीन संहिता गुरुकुलातर्फे आयोजित 'दिग्गजांच्या मुलाखती' या कार्यक्रमात ते बोलत होते. टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कुलच्या गणेश सभागृहात आयोजित कार्यक्रमावेळी ज्येष्ठ वैद्य प्रवीण जोशी, संयोजक वैद्य डॉ. हरीश पाटणकर, डॉ. स्नेहल पाटणकर, गुरुकुलाचे विश्वस्त सुरेश मोहिते, नीता मोहिते आदी उपस्थित होते. यावेळी वैद्य संतोष सूर्यवंशी यांना 'कै. नानासाहेब पाटणकर स्मृती आयुर्वेद कृषीरत्न पुरस्कार', तसेच वैद्य प्रवीण जोशी यांना 'आचार्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. वैद्य हरीश पाटणकर लिखित 'ईसीजी ऑफ स्कीन' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. गुरुकुलाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. गुरुकुलाच्या केशायुर्वेद उपक्रमाच्या दशकपूर्तीनिमित्त केशायुर्वेद रत्न पुरस्कारही प्रदान करण्यात आले. सचिंद्र प्रताप सिंह म्हणाले, "शिक्षण क्षेत्रात अपवादाने घडणाऱ्या दुर्दैवी घटकांना पायबंद घालण्यासाठी यंत्रणा प्रयत्नशील आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार 'एनसीईआरटी'कडून अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल केले जात आहेत.

# जागतिक क्लेफ्ट जागरूकता दिनानिमित्त स्माईल ट्रेन इंडियाचा जनजागृती उपक्रम

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**



दरवर्षी 20 जुलै रोजी जगभरात जागतिक क्लेफ्ट जागरूकता दिन (वर्ल्ड क्लेफ्ट अवेअरनेस डे) साजरा केला जातो. या दिवसाची सुरुवात वर्ष २०२५ मध्ये स्माईल ट्रेनने केली होती. क्लेफ्ट (फाटलेले ओठ आणि टाळू) याबाबत लोकांमध्ये जागरूकता वाढवणे आणि या विषयाला सार्वजनिक आरोग्याशी संबंधित महत्त्वाचा मुद्दा म्हणून समोर आणणे हा यामागचा उद्देश आहे. क्लेफ्टसह जन्मलेल्या प्रत्येक मुलाला वेळेवर आणि योग्य उपचार मिळावेत, हे सुनिश्चित करणे हा या दिवसाचा मुख्य हेतू आहे. यावर्षी क्लेफ्ट उपचार क्षेत्रात काम करणाऱ्या देशातील आघाडीच्या स्वयंसेवी संस्था स्माईल ट्रेन इंडियाने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. वर्ष 2000 पासून आतापर्यंत संस्थेने संपूर्ण भारतात 8 लाखांहून अधिक मुलांना मोफत क्लेफ्ट शस्त्रक्रिया मिळवून देण्यात मदत केली आहे. या मोठ्या यशानंतर आता संस्थेचा मुख्य भर लोकांमध्ये जागरूकता वाढवण्यावर आहे, जेणेकरून क्लेफ्टसह जन्मलेल्या प्रत्येक मुलाची वेळेत ओळख होईल आणि त्याला योग्य वेळी उपचार मिळू शकतील. यामुळे ही मुले निरोगी आणि चांगले आयुष्य जगू शकतील.

# हर्षवर्धन सपकाळ यांची डॉ. कुमार सप्तर्षींना भावपूर्ण श्रद्धांजली



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ज्येष्ठ समाजवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारविश्वातील एक दीपस्तंभ होते, अशा शब्दांत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. गांधीवाद, भारतीय संविधान आणि संपूर्ण क्रांतीचा विचार त्यांनी आपल्या आचार-विचारातून आयुष्यभर जपला. विचारांची निष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनाची अखंड तळमळ हीच त्यांची खरी ओळख होती.

समाजपरिवर्तनासाठी दिलेले त्यांचे योगदान, युवकांना दिलेली वैचारिक दिशा आणि अन्यायाविरोधातील त्यांचा संघर्ष सदैव प्रेरणादायी राहील. त्यांनी जपलेली विचारांची परंपरा तसेच लोकशाही, संविधान आणि गांधीवादी मूल्यांच्या रक्षणाची लढाई पुढे नेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही सपकाळ यांनी नमूद केले. डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या अंत्यविधीला हर्षवर्धन सपकाळ उपस्थित होते.

# 'We Learn English' उपक्रमाचा शुभारंभ

## इंग्रजीची भीती दूर करण्यासाठी अभिनव पुढाकार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विद्यार्थ्यांमधील इंग्रजी विषयाची भीती दूर करून त्यांच्यात संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास विकसित करण्याच्या उद्देशाने वडगाव खुर्द येथील कै. नारायणराव नवले प्राथमिक विद्यालय (मनपा शाळा क्र. २०४ बी) येथे 'We Learn English' (आम्ही इंग्रजी शिकतो) या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस (CLR) यांच्या माध्यमातून हा उपक्रम इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभर राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमात चार पात्रांच्या दैनंदिन जीवनातील संवादातून विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकविण्यात येणार असून, मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांचा समतोल वापर करून विद्यार्थ्यांमध्ये ऐकणे, बोलणे आणि समजून घेण्याची क्षमता विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील इंग्रजीची भीती कमी होऊन आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार असल्याचे वर्गशिक्षिका सौ. श्रद्धा नाडकर्णी यांनी सांगितले. या उपक्रमाचे आयोजन व नियोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक श्री. दत्तात्रेय सूर्यवंशी व श्री. प्रशांत हजारे यांनी केले. उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी प्रभागाच्या नगरसेविका सौ. कोमल नवले प्रमुख उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत उपक्रमाचे कौतुक केले.




यावेळी नगरसेविका सौ. कोमल नवले म्हणाल्या, "महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी इंग्रजीची भीती न बाळगता आत्मविश्वासाने संवाद साधावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. बदलत्या काळात इंग्रजीचे ज्ञान अत्यंत महत्त्वाचे असून 'We Learn English' सारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला निश्चितच चालना मिळेल. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांना माझे कायम सहकार्य राहील." यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तसेच शिक्षक सौ. प्रमिला तनपुरे, सौ. वैशाली रणधीर, सौ. क्षितिजा साठे, सौ. कविता दराडे, श्री. संजय हारपुडे आणि सौ. शर्मिला करंजावणे उपस्थित होते.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. २१ जुलै २०२६




# कॉक्रोज जनता पार्टीच्या आंदोलनाला पाठिंबा

## पुणे स्टेशन परिसरात हजारोंच्या संख्येने विद्यार्थी सहभागी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कॉक्रोज जनता पार्टीच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबईपाठोपाठ पुण्यात पुणे स्टेशन परिसरातील आंबेडकर पुतळ्याजवळ विद्यार्थ्यांनी आंदोलन केले आहे. मोठ्या संख्येने या आंदोलनात तरुण सहभागी झाले आहेत. यावेळी आंदोलकांकडून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. पुणे स्टेशन परिसरात या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, इंकलाम जिंदाबादच्या, नीट परीक्षा रद्द करा असे पोस्टर घेऊन विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले आहेत.




केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉक्रोज जनता पार्टीने राजधानी दिल्लीत सुरू केलेले आंदोलन अधिकच तीव्र झाले आहे. आज आंदोलकांकडून संसदेवर मोर्चाही काढण्यात आला. दरम्यान, केंद्र सरकारविरोधातील हे आंदोलन अधिकच तीव्र झालेले असतानाच विद्यार्थ्यांना मारहाण झाल्याचे अमोर आले आहे. नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि शिक्षणक्षेत्रातील अनागोंदी विरोधात आंदोलन करत असलेल्या कॉक्रोज जनता पार्टीच्या आंदोलकांच्या मोर्चाने संसदेच्या दिशेने कूच केली. हा मोर्चा संसद भवनाजवळ थोड्याच वेळात दाखल झाल्यावर आंदोलकांना रोखण्यासाठी संसद भवन आणि आसपासच्या परिसरात कडेकोड पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यावेळी विद्यार्थ्यांवर अश्रुधुराच्या नळकांड्या सोडण्यात आल्या. तसेच त्यांच्यावर वाईट पद्धतीने लाठीचार्ज करण्यात आला आहे. दरम्यान, केंद्र सरकार आमच्याशी चर्चेस तयार झाले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी केंद्र सरकारचे मंत्री जे. पी. नड्डा यांच्यासोबत सीजेपी प्रतिनिधींची महत्त्वाची बैठक होणार आहे, असा दावा कॉक्रोज जनता पार्टीकडून करण्यात आला आहे.
















## काय घडले?

- सकाळी ६.३९ : सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी मोर्चा संपल्यानंतर त्यांचे उपोषण मागे घेण्यासाठी काही अटी ठेवल्या आहेत.
- सकाळी ८.४५ : एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने माहिती दिली की, जर मोर्चा नियंत्रणात ठेवला, तर सरकार चर्चा करण्यास आणि संवादाची नवीन दारे उघडण्यास तयार आहे.
- सकाळी ९.०० : नवी दिल्लीचे डीसीपी सचिन शर्मा यांनी माहिती दिली की, पोलिसांनी आंदोलकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, त्यांनी पोलिसांची विनंती फेटाळली.
- सकाळी ९.३० : नियोजित मोर्चाच्या वेळेच्या २५ मिनिटे आधीच, दिल्ली पोलिसांनी बॅरिकेडस् लावून आंदोलकांना जंतरमंतर आंदोलनस्थळावरून बाहेर पडण्यापासून रोखले.
- सकाळी १०.०० : सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अंगमो जंतर-मंतर येथे पोहोचल्या.
- सकाळी १०.०० : 'आप'चे खासदार संजय सिंह, भीम आर्मीचे प्रमुख आणि खासदार चंद्रशेखर आझाद, वकील प्रशांत भूषण, अभिनेत्री शबाना आझमी आणि अभिजित दिपके **आंदोलनस्थळी.**
- सकाळी १०.२० : 'आयसा'च्या कार्यकर्त्या नेहा, आमीन आणि मनीष यांनी त्यांचे उपोषण सोडले.
- सकाळी १०.५० : पोलिसांनी पटेल चौक मेट्रो स्थानकाजवळ सौम्य बळाचा वापर केला.
- सकाळी ११.०० : पोलिसांनी बॅरिकेडस् हटवले आणि मोर्चा पुढे जाण्यास परवानगी दिली.
- सकाळी ११.४५ : अनेक आंदोलकांनी बॅरिकेडस् तोडले आणि पटेल चौकाच्या दिशेने कूच केली.
- सकाळी ११.५५ : समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव खासदारांसह संसदेतून जंतर-मंतरच्या दिशेने निघाल्या.
- सकाळी ११.५९ : सरकारने चर्चेसाठी संपर्क साधल्यानंतर आशुतोष रांका आणि सौरव दास केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांना भेटण्यासाठी निघाले.
- दुपारी १.३० : सोमवारी नवी दिल्लीत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली.
- दुपारी २.२८ : सौरव दास यांनी सोमवारी सांगितले की, त्यांनी आणि आशुतोष रांका यांनी भाजप अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेतली.
- दुपारी ४.०० : पोलिसांनी आंदोलकांवर कडक कारवाई केली; स्टेज रिकामा केला.
- रात्री ९.१० : आशुतोष रांका यांनी सांगितले की, ग्रुप आंदोलकांमधील दुखापतींच्या तीव्रतेचे मूल्यांकन करत असून, कायदेशीर आणि वैद्यकीय मदत पुरवत आहे.

**विद्यार्थ्यांनी उपोषण सोडले :** २३ दिवस उपोषण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शबाना आझमी आणि प्रकाश राज यांच्या हस्ते ज्यूस घेऊन उपोषण सोडले.



## थोडक्यात पण महत्वाचे

### आजारांचा धोका; ताप, डेंग्यू आणि मलेरियाबाबत सतर्कतेचे आवाहन

बारामती (आरंभ पर्व) : पावसाळ्याच्या आगमनासोबत बारामती परिसरात ताप, डेंग्यू, मलेरिया आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आरोग्याबाबत अधिक सतर्क राहावे आणि लक्षणे दिसताच तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने केले आहे. पावसाळ्यातील आजारांच्या पार्श्वभूमीवर कंपनीने महाराष्ट्रभर आपली आरोग्य सेवा मोहीम अधिक व्यापक केली आहे. स्टार हेल्थच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील महाराष्ट्रातील आकडेवारीनुसार, ताप आणि संसर्गजन्य आजारांसाठी घरगुती आरोग्यसेवेचा लाभ घेणाऱ्यांच्या संख्येत तब्बल पाच पटीने वाढ झाली आहे. त्याचबरोबर डॉक्टरांचा ऑनलाइन सल्ला घेण्याकडेही नागरिकांचा कल वाढत आहे. आजाराची लक्षणे जाणवताच प्राथमिक वैद्यकीय मार्गदर्शन मिळविण्यासाठी नागरिक ऑनलाइन डॉक्टरांच्या सल्ल्याला प्राधान्य देत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या मोहिमेच्या माध्यमातून विमाधारकांना आजाराच्या सुरुवातीच्या टप्प्यातच योग्य वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. विमाधारकांना घरगुती आरोग्यसेवा किंवा नियोजित रुग्णालय प्रवेशासंदर्भातील मार्गदर्शनासाठी ‘टॉक टू स्टार’च्या ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. घरगुती आरोग्यसेवेसाठी १, तर नियोजित रुग्णालय प्रवेशाच्या मदतीसाठी २ क्रमांकाचा पर्याय निवडता येईल. बिगर-विमाधारक आणि सर्वसामान्य नागरिकांना स्टार हेल्थच्या ग्राहक अनुप्रयोगाच्या माध्यमातून मोफत चोवीस तास ऑनलाइन बाह्यरुग्ण वैद्यकीय सल्ला घेता येणार आहे.

### टाकेडाची क्यूडेंगा ही भारतात मंजुरी मिळालेली पहिली डेंग्यू लस

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : टाकेडा बायोफार्मास्युटिकल्स इंडिया प्रा. लि. ने आज ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने (डीसीजीआय) वय वर्षे ४ ते ६० वयोगटातील व्यक्तींमध्ये डेंग्यू रोगाच्या प्रतिबंधासाठी टाकेडाच्या 'क्यूडेंगा' या डेंग्यू लसीला बाजार परवाना (सीटी-२०, नवीन औषधे आणि चिकित्सकीय चाचण्या (एनडीसीटी) नियम, २०१९) दिला आहे. क्यूडेंगा ही भारतात मंजूर झालेली पहिली डेंग्यू लस असून लसीकरणापूर्वीच्या चाचणीची आवश्यकता भासत नाही. तसेच, पूर्वी डेंग्यूचा संसर्ग झाला असो वा नसो, ती लोकांवर वापरली जाऊ शकते. ही मंजुरी भारतातील डेंग्यू प्रतिबंधाचे प्रयत्न अधिक बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असून इथे हा रोग एक मोठे सार्वजनिक आरोग्य आव्हान ठरला आहे. डेंग्यू हा डासांमुळे पसरणारा एक विषाणूजन्य आजार आहे. तो जागतिक सार्वजनिक आरोग्यासाठी एक मोठा धोका असून १२५ हून अधिक देशांमध्ये त्याचा प्रादुर्भाव आहे. जागतिक स्तरावर डेंग्यूच्या एकूण रुग्णांपैकी जवळपास एक तृतीयांश रुग्ण भारतात आहेत. नोंदवलेल्या रुग्णांची संख्या २०२५ मध्ये १,१३,००० पेक्षा जास्त होती, परंतु मॉडेलिंग विश्लेषणानुसार भारतातील डेंग्यूचा भार नोंदवलेल्या संख्येपेक्षा जास्त असल्याचे दिसते. हे दरवर्षी लाखो संसर्गांचे प्रतिनिधित्व करते.

### एडलवाइस लाइफचा ९९.३१ टक्के दावा निकाली काढण्याचा दर

पुणे (आरंभ पर्व) : एडलवाइस लाइफ इन्शुरन्सने आर्थिक वर्ष 2026 मध्ये आजवरचा सर्वाधिक 99.31% क्लेम सेटलमेंट रेशो नोंदवला असून, सलग चौथ्या वर्षी हा रेशो 99% पेक्षा जास्त राहिला आहे. कंपनीने शून्य क्लेम प्रलंबितता देखील साध्य केली आहे, म्हणजेच आर्थिक वर्षात प्राप्त झालेला प्रत्येक क्लेम निकाली काढण्यात आला. यातून ग्राहक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या गरजेच्या क्षणी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची विमा कंपनीची बांधीलकी पुन्हा एकदा अधोरेखित होते. क्लेम सेटलमेंट रेशो हा एकूण प्राप्त क्लेम्सपैकी दिलेल्या मृत्यू दाव्यांची टक्केवारी मोजतो आणि पॉलिसीधारकांप्रती दिलेली वचनबद्धता पाळण्याच्या विमा कंपनीच्या क्षमतेचा हा एक अत्यंत महत्त्वाचा सूचक मानला जातो. एडलवाइस लाइफ इन्शुरन्सचे एमडी आणि सीईओ सुमित राय म्हणाले, "जीवन विमा हा विश्वासावर आधारित असतो, कारण त्याचे मूल्य खरेदीनंतर अनेक वर्षांनी सिद्ध होते. हे पॉलिसीधारकाने आपल्या प्रियजनांना दिलेल्या वचनाचे प्रतीक आहे आणि त्यांच्या आकांक्षा अबाधित राहाव्यात यासाठी हे वचन पूर्ण करणे, हा आमच्यासाठी सर्वोच्च सन्मान आहे. हा आकडा जलद, काळजीपूर्वक आणि पारदर्शक पद्धतीने खऱ्या हक्कमागण्यांची पूर्तता करण्याच्या आमच्या बांधीलकीचा प्रतिबिंब आहे."

### सीमेन्सने पुण्यात एक्सक्लुझिव्ह ब्रँड स्टोअर ची केली घोषणा



पुणे (आरंभ पर्व) : बीएसएच हाऊसगेरेट जीएमबीएच ची उपकंपनी आणि प्रीमियम होम अप्लायन्सेसमधील जागतिक अग्रणी असलेल्या बीएसएच होम अप्लायन्सेस प्रा. लि. ने आज शेरिल एंटरप्रायझेस प्रा.लि. च्या भागीदारीत पुण्यात आपल्या एक्सक्लुझिव्ह सीमेन्स ब्रँड स्टोअर ची घोषणा केली आहे. सोलिटेअर बिझनेस हब-१, बाणेर येथे स्थित, हे नवीन ब्रँड स्टोअर सिमेन्सची 'इंटेलिजेंट लिव्हिंग'ची संकल्पना पुण्यात आणते. हे एक असे आकर्षक ठिकाण आहे, जिथे अर्थपूर्ण नावीन्य, कनेक्टेड तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक डिझाइन एकत्र येऊन आधुनिक स्वयंपाकघराला एक नवीन ओळख देतात. केवळ एक विक्री केंद्र न राहता, हे स्टोअर घरमालक, वास्तुविशारद आणि डिझाइनर्सना हे अनुभवण्याची संधी देते की, इंटेलिजेंट उपकरणे एकात्मिक परिसंस्थेप्रमाणे एकत्र कशी काम करतात; ती गरजांचा अंदाज घेतात, दैनंदिन कामे सोपी करतात आणि दैनंदिन जीवनाला उन्नत करणारे समृद्ध अनुभव निर्माण करतात. पुणे हे भारतातील सर्वात प्रगत गृहनिर्माण बाजारांपैकी एक म्हणून उदयास आले आहे. २०२१ ते २०२५ या काळात येथे ४.२८ लाखांहून अधिक घरांची विक्री झाली, जी देशातील सर्वाधिक आहे. आता नवीन घरांपैकी निम्मी घरे ही प्रीमियम आणि लक्झरी सेगमेंटमधील आहेत, जे ग्राहकांच्या बदलत्या आवडीचे दर्शन घडवते. लोक आता मॉड्युलर किचन आणि कनेक्टेड उपकरणांकडे वळत आहेत, ज्यामुळे किचन केवळ स्वयंपाकाची जागा न राहता एक 'स्मार्ट वातावरण' बनत आहे.

# भिडे वाडा राष्ट्रीय स्मारकाच्या कामाची उपमहापौर यांच्याकडून पाहणी

## महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्षांतच काम पूर्ण करण्याचे उपमहापौरांचे निर्देश



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बुधवार पेठेतील ऐतिहासिक भिडे वाडा येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय स्मारकाच्या उभारणीच्या कामाची आज प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी संबंधित अधिकारी, अभियंते आणि वास्तुविशारदांकडून कामाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. स्मारकाचे काम दर्जेदार, नियोजित वेळेत, महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्षांतच आणि ऐतिहासिक वारशाला साजेसे पूर्ण करण्याच्या सूचना उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी दिल्या. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांनी सन १८४८ मध्ये याच भिडे वाड्यात भारतातील मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून शिक्षण, समता आणि सामाजिक परिवर्तनाची क्रांतिकारी मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळे भारतीय सामाजिक इतिहासात या वास्तूला विशेष महत्त्व असून ती प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणास्थान मानली जाते. पाहणी दौऱ्यावेळी भवन विभागाचे अधीक्षक अभियंता बिपीन शिंदे, कार्यकारी अभियंता धायगुडे, उपअभियंता पांडकर तसेच आर्किटेक्ट धनंजय सालकर उपस्थित होते. पाहणीदरम्यान स्मारकाच्या वास्तुरचनेची सद्यस्थिती, विविध विकासकामे तसेच पुढील टप्प्यांतील नियोजनाची माहिती अधिकाऱ्यांनी उपमहापौर वाडेकर यांना दिली. स्मारकात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा प्रेरणादायी अनुभव मिळेल, यासाठी आवश्यक सुविधा आणि माहितीपर उपक्रम विकसित करण्यावर भर देण्याच्या सूचना करण्यात आल्या. यावेळी भिडे वाड्याच्या जतन आणि संवर्धनासाठी झालेल्या पहिल्या आंदोलनाची आठवण जागवताना वाडेकर यांनी त्यांच्यावर ऊयाय आंदोलणासाठी 11 गुन्हे दाखल असल्याचे सांगितले. या ऐतिहासिक वास्तूचे संरक्षण व्हावे आणि भावी पिढ्यांसाठी ती प्रेरणास्थान म्हणून उभी राहावी, अशी त्या आंदोलन मागील भावना होती. आज त्याच संकल्पनेचे राष्ट्रीय स्मारकाच्या रूपाने साकार होत असलेले चित्र समाधानकारक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी वंचित, शोषित आणि महिलांना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी केलेले कार्य संपूर्ण मानवतेसाठी दीपस्तंभ असल्याचे नमूद करण्यात आले. त्यांच्या विचारांचा वारसा जतन करून पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य भिडे वाडा राष्ट्रीय स्मारकाच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वासही वाडेकर यांनी व्यक्त केला.

# सुर्यकांत गवळी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित




**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**

दिनांक १८ जुलै २०२६ रोजी भारत इतिहास संशोधन मंडळ, राजवाडे हॉल, सदाशिव पेठ, पुणे येथे आयोजक पुरस्कार सोहळा २०२६ व्यवस्थापन - विजेता मीडिया, पुणे यांनी उत्कृष्टपणे कार्यक्रम केला या कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री गोपालजी खंडारेसर चेअरमन - स्वराज्य कॉलेज ग्रुप व प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री ड्रॉ महेशजी थोरवे सर संचालक - माईस एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, पुणे हे होते, मुख्य व्यवस्थापक माननीय सौ भारतीताई तुपे यांनी केले यावेळी माननीय सूर्यकांत सुखदेव गवळी माजी कॅबिनेट मंत्री,. मा.अध्यक्ष- ग्राहक कल्याण सल्लागार समिती, महाराष्ट्र शासन , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार, अध्यक्ष- राष्ट्रवादी ग्राहक संरक्षण समिती, महाराष्ट्र प्रदेश व संस्थापक /अध्यक्ष - यशवंत ग्राहक आधार प्रतिष्ठान, महाराष्ट्र प्रदेश यांना आदर्श गौरव सन्मान सोहळा २०२६ या कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्रात ग्राहक कल्याण, ग्राहक संरक्षण व ग्राहक जागृती गेली ३५ वर्षां पासून ग्राहक चळवळीत काम केल्या मुळे, १९९१ पासून ग्राहक तीर्थ, गुरुवर्य मा.बिंदूमाधव जोशीसाहेब व माननीय अजित दादा पवार उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र आणि गुरुवर्य,माननीय श्री शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात ग्राहक चळवळीचे जाळे मोठ्या प्रमाणात उभे करून ग्राहकांना त्यांचे हक्क व अधिकार तसेच कर्तव्याची जाणीव करून देऊन तमाम ग्राहकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.

ग्राहक कायद्याची माहिती व जागृती खेडोपाड्यात जाऊन कायद्याची जाणीव जनसामान्यांमध्ये कशी होईल यासाठी खुप कष्ट करून ग्राहक चळवळ संपूर्ण महाराष्ट्रात रुजवल्याबद्दल त्यांना ग्राहक चळवळीच्या समाजकार्या बद्दल आज "राज्यस्तरीय महाराष्ट्र ग्राहक भूषण गौरव पुरस्कार" देण्यात आला या पुरस्कारामध्ये सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र भारतीय तिरंगा प्रतीक शाल गळ्यात टाकून मान सन्मान करण्यात आला.

यावेळी विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या इतर मान्यवरांना देखील पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

# डॉ. बत्राजकडून प्रगत हेअर रिग्रोथ ट्रीटमेंट 'हेअरगेन' सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डॉ. बत्राज हेल्थकेअरने ५० अब्ज एक्सोसोम्सच्या शक्तीवर चालणाऱ्या, भारतातील पहिल्या प्रगत केस पुनर्वाढीच्या उपचाराची, ‘हेअरगेन’ची आज घोषणा करून रिजनरेटिव्ह मेडिसिनच्या (पुनरुत्पादक औषधशास्त्र) क्षेत्रात एक नवीन टप्पा गाठला.



त्यामुळे केस पुनरुज्जीवनासाठी शस्त्रक्रियाविरहित उपाय शोधणाऱ्या रुग्णांसाठी जगातील सर्वात आश्वासक रिजनरेटिव्ह तंत्रज्ञानांपैकी एक उपलब्ध होत आहे. केस गळणे ही आता केवळ सौंदर्याची समस्या राहिलेली नाही. भारतातील सर्व वयोगटांतील १५ कोटी लोकांसाठी ही एक भावनिक आणि आत्मविश्वास खच्ची करणारी समस्या बनली आहे.‘हेअरगेन’ हे केस गळण्याच्या विविध टप्प्यांचा आणि कारणांचा अनुभव येणाऱ्या पुरुष आणि महिलांसाठी विकसित करण्यात आले आहे. यामध्ये आनुवंशिक केसगळती (पुरुष आणि महिलांमधील टक्कल पडणे), प्रसूतीनंतरची केसगळती, रजोनिवृत्तीनंतर केस पातळ होणे, तणावामुळे होणारी केसगळती आणि केस पातळ होण्याच्या सुरुवातीच्या टप्प्याचा समावेश आहे. ‘हेअरगेन’ टाळूला थेट शक्तिशाली पुनरुत्पादक संकेत देऊन, सुप्त केसांच्या मुळांना उत्तेजित करते, टाळूचे आरोग्य सुधारते आणि शरीरातील नैसर्गिक केस वाढण्याच्या प्रक्रियेला प्रोत्साहन देते. त्यामुळे कालांतराने केस अधिक जाड, दाट आणि निरोगी दिसण्यास मदत होते.

# एनबीसी बेअरिंग्जने आफ्टरमार्केट पोर्टफोलिओचा केला विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेड. या भारतातील आघाडीच्या बेअरिंग उत्पादकाच्या आणि विश्वासार्ह मोबिलिटी सोल्यूशन्स भागीदाराच्या ब्रँड असलेल्या एनबीसी बेअरिंग्जने आज ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट उत्पादनांची एक विस्तृत नवीन श्रेणी लाँच करण्याची घोषणा केली, जी कंपनीच्या वाढ आणि विविधीकरण धोरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. बेअरिंग्ज आणि संबद्ध अभियांत्रिकी उत्पादने व सेवांमधील आपल्या मजबूत वारशावर आधारित, एनबीसी बेअरिंग्ज आता टू/थ्री व्हीलर आणि प्रवासी कारसाठी वायपर ब्लेड्स, ब्रेक पॅड्स, बेल्ट्स, स्टिअरिंग रॉड्स आणि इतर अनेक महत्त्वाच्या वाहन घटकांसह अनेक उच्च-संभाव्य ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट श्रेण्यांमध्ये प्रवेश करत आहे. ही धोरणात्मक विस्तार एनबीसी बेअरिंग्जच्या सर्वसमावेशक ऑटोमोटिव्ह उपाय प्रदान करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, तसेच ती जलद वाढणाऱ्या भारतीय ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केटचा लाभ घेण्याचे काम करते. या प्रसंगी बोलताना अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहित साबू म्हणाले "वाढती वाहन मालकी, वाहनांच्या दीर्घायुष्य चक्र आणि दर्जेदार बदली भागांची वाढती मागणी यामुळे भारतीय ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट अभूतपूर्व वाढ अनुभवत आहे. दशकांच्या अभियांत्रिकी उत्कृष्टतेसह एक विश्वासार्ह ब्रँड म्हणून, एनबीसी बेअरिंग्जकडे या संधीचा लाभ घेण्यासाठी अनन्य स्थान आहे. आमच्या विस्तारित ऑटो पार्ट्स पोर्टफोलिओचे लॉन्च हे विविधीकरणाकडे एक धोरणात्मक पाऊल आहे.

# खेड बाजार समितीच्या सभापती, उपसभापतींचे राजीनामे

## २८ जुलै होणार निवडणुक

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

येथील कृषि उत्पन्न बाजार समिती खेडचे सभापती अॅड. विजयसिंह शिंदे पाटील, उपसभापती क्रांतीताई सोमवंशी यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. मंगळवारी (दि. २८ ) सभापती, उपसभापती पदाची निवडणूक होणार आहे. पुढचा सभापती कोण? याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

खेड कृषि उत्पन्न बाजार समितीचे सध्याचे संचालक मंडळ सन २०२३ मध्ये अस्तित्वात आले. त्यावेळी आमदार असलेल्या दिलीप मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली १८ पैकी ११ संचालक निवडून आले होते. कैलास लिंभोरे हे सभापती आणि विठ्ठल वनघरे उपसभापती झाले. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांचा राजीनामा घेण्यात आला. मात्र नंतर राजकीय उलथापालथ होऊन मोहिते गटाचे चार संचालक विरोधकांना जाऊन मिळाले. विरोधकांच्या एकजुटीचे नेतृत्व विजयसिंह शिंदे पाटील यांनी केले आणि पुढे ते सभापतीही झाले होते. विरोधी गटातील मुळ आणि दिलीप मोहिते पाटील यांच्या कडून आलेल्या पैकी काहींना सभापती, उपसभापती पदावर संधी देण्याचे त्यावेळी ठरले होते. त्यानंतर विधानसभा निवडणूक झाली. त्यात अॅड. विजयसिंह शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली बाजार समिती संचालक मंडळाच्या प्रयत्नाला चांगले यश मिळाले. शिवसेना उबाठा गटाचे बाबाजी काळे आमदार झाले. पुढे पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणूक झाली. सभापती अॅड शिंदेपाटील जिल्हा परिषद सदस्य झाले. त्यांनाही आमदार बाबाजी काळे यांच्यासह सर्वांची मदत झाली. ५ जिल्हा परिषद सदस्यांसह पक्ष आणि गटाला पंचायत समितीच्या सभागृहात बहुमत मिळाले. असे असले तरी बाजार समितीच्या सभापतीपदाची खंत इच्छुकांना होती. आता संधी मिळणार असली तरी, उशीर झाला असुन पुढे किती संचालकांच्या गळ्यात ही माळ पडणार याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत.

जिल्हा परिषदेचे गटनेते अॅड विजयसिंह शिंदे पाटील यांनी बाजार समितीचे सभापतीपद घेतल्यानंतर शेतकऱ्यांसाठी अनेक महत्वाचे आणि फायद्याचे निर्णय घेतले. त्यात चाकण येथील आवारात ३ कोटी ५० लाख रुपये खर्च करून भव्य शेड (ऑक्शन हॉल) उभारण्यात आला आहे. ज्यामुळे येथे विक्रीसाठी येणारा कांदा, बटाटा तसेच इतर भाजीपाला ऊन, पावसात सुरक्षित राहणार आहे.चाकण आणि राजगुरुनगर येथे अल्प दरात शेतकरी भोजन थाळी योजना सुरू केली. त्याला तालुका आणि तालुक्याबाहेरून येणाऱ्या शेतकरी, व्यापारी, आडते यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यापूर्वी केवळ चाकण बाजार आवारात कांदा, बटाटा लिलाव करण्यात येत होते.

गत वर्षी राजगुरुनगर येथे कांदा, बटाटा खरेदी विक्री सुरू करण्यात आली. शेतकऱ्यांचा शेतीमाल विक्री नंतर तात्काळ मोबाईल एसएमएस येऊ लागले. ऑनलाईन व्यवहार त्याचबरोबर जगातील बाजार माहिती मिळावी यासाठी डिजिटल प्रणाली विकसित करण्यात आली. चाकण येथे बैलबाजार, शेळी बाजार व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले. सगळ्या आवारात काँक्रीटीकरण करण्यात आले.

# वरुडे-पाबळ रस्त्याची दुरावस्था



दुरूस्तीची ग्रामस्थांची मागणी

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील वाफगाव - वरुडे ते पाबळ या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. रस्त्याच्या साईडपट्टयांची उखडल्या आहेत. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. दुचाकी व चारचाकी वाहन चालवताना वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. पावसामुळे या रस्त्याची अवस्था बिकट झाल्याने रस्त्याची तातडीने दुरूस्ती करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वाफगाव - वरुडे - पाबळ हा खेड व शिरूर या दोन तालुक्याला जोडणारा दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाचा रस्ता आहे. काही वर्षांपूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. खेड तालुक्याच्या पूर्व भागातील नागरिक शिरूर, रांजणगाव व शिक्रापूर या परिसरात जाण्यासाठी या जवळच्या मार्गाचा अवलंब करतात. अनेक प्रवाशी या रस्त्यावरून ये-जा करत असतात. या रस्त्यावरील खड्डे अनेक दिवसांपासून जैसे थे असल्याने खड्डे मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. तसेच अनेक ठिकाणी साईडपट्ट्या देखील पूर्णपणे उखडल्या आहेत.

वाफगाव व वरुडे येथील अनेक विद्यार्थी अकरावी - बारावीच्या शिक्षणासाठी पाबळ येथील महाविद्यालयात जात असतात. तसेच या भागातुन शिक्रापूर व रांजणगाव या औद्योगिक क्षेत्रात कामासाठी जाणाऱ्या कामगारांची संख्या मोठी आहे. पाबळ या ठिकाणी उपबाजार समितीत खेड तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक शेतकरी शेतमाल विक्रीसाठी घेऊन जातात, परंतु रस्त्याची अवस्था दयनीय झाल्याने शेतकऱ्यांना रस्त्यावरील खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. वाफगाव, वरुडे, गाडकवाडी, चौधरवाडी या परिसरातील विद्यार्थ्यांना पाबळ येथिल विद्यालयात शिक्षणासाठी याच रस्त्याने प्रवास करावा लागत आहे. त्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असून त्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र संघवी यांनी सांगितले. या खड्ड्यात पडून अनेक विद्यार्थी जखमी झाले आहेत व वाहनांचे देखील नेहमीच नुकसान होत आहे. याबाबत संबंधित बांधकाम विभागाने रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी प्रवाशी व ग्रामस्थांनी केली आहे.

# राष्ट्रीय ऑलिम्पियाड परीक्षेत प्रमित बोरकरचे दैदिप्यमान यश

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

संपूर्ण देशभरामध्ये अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या राष्ट्रीय मेंटल ॲप्टीट्युड ऑलिम्पियाड (तार्किक क्षमता) स्पर्धेत कु. प्रमित प्रसाद बोरकर याने घवघवीत यश संपादन केले आहे. प्रमितने या कठीण परीक्षेत संपूर्ण भारतातून ११३ वा क्रमांक पटकावून आपल्या कुटुंबाचा आणि शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. त्याच्या या दैदिप्यमान यशामुळे सध्या सर्व स्तरांतून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. आय आय टी आणि आय आय एम. च्या माजी विद्यार्थ्यांमार्फत चालवल्या जाणाऱ्या या राष्ट्रीय परीक्षेच्या अंतिम फेरीत प्रमितने ही चमकदार कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, या परीक्षेत चुकीच्या उत्तरांसाठी उणे गुण आणि अधिक काठिण्यपातळीचे प्रश्न असूनही प्रमितने आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर हे यश मिळवले.



प्रमित हा लोणी काळभोर (ता. हवेली) येथील कै. भगवंत जयवंत बोरकर गुरुजी यांचा पणतू असून, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील मुख्य अधिकारी प्रसाद दिलीपराव बोरकर यांचा मुलगा आहे. तो कल्याण मधील सेंट लॉरेन्स इंटरनॅशनल स्कूल मध्ये इयत्ता तिसरी मध्ये शिकत आहे. प्रमितने त्याच्या या यशाचे श्रेय आई-वडील आणि शाळेतील शिक्षकांकडून मिळालेल्या योग्य मार्गदर्शनाला दिले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.